



दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : २५५ वा शनिवार दि २० डिसेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये






# ओएसडी अधिकाराचा गैरवापर?

# बुलढाण्यात न्यायप्रविष्ट शेतजमीन बळकावल्याचा गंभीर आरोप मुख्यमंत्री सचिवालयात तारे परिवाराची आर्त हाक...

भाग ७

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात शासकीय पद,राजकीय सत्तेची जवळीक आणि पोलिसांची उदासीनता यांच्या जोरावर न्यायप्रविष्ट शेतजमीन बळकावण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. बुलडाणा शहरापासून १२ किमी वर असलेले मौजे डोंगरखंडाळा येथील गट नं. १७५ (११.३१ आर) ही शेतजमीन उपजिल्हाधिकारी भूसंपादन२६ पुणे व मंत्री ओएसडी पदावर कार्यरत सिध्दार्थ वसंता भंडारे याने पदाचा गैरवापर करून हडपल्याचा गंभीर आरोप शेतकरी राहुल मिननाथ तारे यांनी त्यांच्या तक्रारीत केला आहे. लोकतंत्र सेनानी असलेल्या वडिलांच्या काळापासून तारे कुटुंबाच्या ताब्यात असलेली ही जमीन वारस नोंदी अपूर्ण असल्याने आणि प्रकरण न्यायालयात (लिस पेंडन्सी क्र. ४३३९/२०२३) प्रलंबित असतानाही, कोणतीही नोटीस न



पीडित तारे परीवार

देता मोजणीचा घाट घालण्यात आला. पुढे थेट मावसभाऊच्या नावाने खरेदीदस्त करून,गहाण असलेली जमीन निबंधक कार्यालयातील त्या साखळीतील संबंधित काही अधिकाऱ्यानी संगनमताने नोंदविल्याचा आरोप तारे परिवाराने केला आहे. या प्रकरणात हरकती,अपील, पोलिस तक्रारी करूनही प्रशासनाने डोळेझाक केली.कळस म्हणजे २ जुलै २०२५ रोजी जेसीबी, ट्रक, ट्रॅक्टर, बाऊंसर व जमाव घेऊन पेरलेल्या शेतात बळजबरी घुसखोरी, नासधूस, सिमेंट खांब गाडून तार कंपाऊंड व टिनशेड उभारण्यात आले. तक्रार घेण्यास ही पोलिसांनी टाळाटाळ केल्याचा आरोप असून ई-मेलने तक्रार द्यावी लागली.न्यायप्रविष्ट प्रकरणातही अतिक्रमणास मूक संमती? पोलिस बंदोबस्त नाकारला असताना ही दादागिरी कशी? हा प्रश्न उपस्थित झाला आहे. मुख्यमंत्री सचिवालयात वारंवार अर्ज करूनही ठोस कारवाई न झाल्याने संताप व्यक्त होत आहे. ओएसडी पदाचा गैरवापर करून जमीन हडपणाऱ्या भूमाफियाफ्वर तात्काळ कठोर कारवाई करा आणि जमीन परत मिळवा, अशी थेट मागणी तक्रारदाराने दिलेल्या अर्जात केली आहे.

# तुरीच्या शेतात गांजाची लागवड १२.५२ लाखांचा मुद्देमाल जप्त!

जनसंचलन/ सिंदखेड राजा


बुलढाणा जिल्ह्यात अमली पदार्थाविरोधात राबविण्यात येत असलेल्या मिशन परिवर्तन अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत तुरीच्या पिकाआड गांजाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्याला रंगेहाथ पकडले. या कारवाईत १२ लाख ५२ हजार १०० रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला असून, संबंधित आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस अधीक्षक नीलेश तांबे यांच्या संकल्पनेतून जिल्हाभरात अमली पदार्थांची वाहतूक, साठवणूक, उत्पादन व विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई सुरू आहे. त्याचाच भाग म्हणून स्थानिक गुन्हे शाखेला गोपनीय माहिती संकलनाचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार १८ डिसेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, मलकापूर पांग्रा (ता. सिंदखेड राजा) येथील शेतकरी सुधाकर संपतराव गायकवाड (वय ६५) याने शेतात अवैधरित्या गांजाची लागवड करून संगोपन केले आहे. माहितीची खातरजमा केल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने साखरखेर्डा पोलिस ठाण्याच्या हद्दीत संबंधित शेतावर पंचासमक्ष छापा टाकला. तपासणीदरम्यान कपाशी व तुरीच्या उंच पिकांआड गांजाची झाडे लपवून लागवड केल्याचे स्पष्ट झाले. शेतातून ७६ किलो ०६ ग्रॅम ओलसर गांजा आणि ५ किलो ५६० ग्रॅम सुकलेला गांजा, असा एकूण ८१.६२ किलो गांजा जप्त करण्यात आला. या गांजाची बाजारभावानुसार किंमत १२.५२ लाख रुपये इतकी आहे. जिल्ह्यात अमली पदार्थाविरोधात विशेष मोहीम राबवून उत्पादन, साठवणूक, वाहतूक व विक्रीवर लक्ष केंद्रीत करत गोपनीय माहितीच्या आधारावर कारवाई करणे, तसेच, तरुणाई व समाजाचे अमली पदार्थांपासून संरक्षण करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. अमली पदार्थाविरोधातील ही कारवाई जिल्ह्यातील माफियांना स्पष्ट इशारा देणारी ठरत असून, मिशन परिवर्तन अधिक तीव्र करण्याचे संकेत पोलिसांनी दिले आहेत. एकाच आठवडचातील बुलढाणा पोलिसांनी दुसरी मोठी कारवाई. आधी मेहुणा राजा येथे ही केली होती कारवाई औषधीद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ अधिनियमाच्या कलम २० (अ) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास साखरखेर्डा पोलीस ठाणे करीत आहे. ही कारवाई अपर पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा (खामगाव) व अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड (बुलडाणा) यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या नेतृत्वाखालील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. पथकात सहायक पोलिस निरीक्षक यशोदा कणसे



यांच्यासह अनेक अधिकारी व अंमलदार सहभागी होते. एकाच आठवड्यातील ही दुसरी मोठी कारवाई आहे. आधी मेहुणा राजा येथे कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर ही कारवाई करण्यात आली. आगामी काळात या कारवायांची व्याप्ती वाढणार आहे.

# ...संचालकांबाबतची संदिग्धता...

बँकिंग नियमन कायद्यात सुधारणा करीत नागरी सहकारी बँकांच्या संचालकांचा कालावधी सलग १० वर्षे करण्यात आल्यानंतर केंद्र सरकारने २९ जुलै रोजी एका परिपत्रकाद्वारे संबंधित सुधारणा दिनांक १ ऑगस्ट २०२५पासून अंमलात येणार असल्याचे जाहीर केले. या परिपत्रकाने या संदर्भातील संभ्रम अधिकच वाढवला आहे. कारण १० वर्षांचा कालावधी कधीपासून मोजायचा याबाबत स्पष्टता नाही. कायद्यातील हा बदल एक ऑगस्ट २०२५पासून लागू झाला आहे. याचाच अर्थ या दिवशी एखाद्या विशिष्ट संचालकास संचालकपदी राहून सलग १० वर्षे पूर्ण झाली असतील तर एक ऑगस्ट २०२५नंतर होणाऱ्या निवडणुकीसाठी तो अपात्र ठरण्याची शक्यता कायद्याच्या तरतुदीत सलग १० वर्षे म्हणजेच कोणताही खंड न घेता १० वर्षांचा कालावधी, असा उल्लेख आहे. जर एखाद्या व्यक्तीने नऊ वर्षे झाल्यानंतर राजीनामा दिला, तर तो पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल. असे झाल्यास कायद्यामधील या सुधारणेचा हेतूच विफल होईल. एखादी व्यक्ती सलग १० वर्षे संचालक राहिल्यानंतर पाच वर्षांच्या खंडानंतर पुन्हा निवडणुकीसाठी पात्र ठरेल का, या प्रश्नाचे उत्तरही नकारार्थीच द्यावे लागेल. कारण सलग १० वर्षे संचालकपदी राहिलेली व्यक्ती त्यानंतर संचालक होण्यास कधीच पात्र ठरणार नाही, असे कायदा सांगतो. याचा अर्थ एखादा संचालक सलग १० वर्षे संचालक राहिल्यास तो नंतर कायमस्वरूपी अपात्र ठरण्याची शक्यता आहे. बँकिंग नियमन कायद्यातील ही तरतूद बँकेच्या अध्यक्षांना व पूर्ण वेळ संचालकांना लागू केलेली नाही. १० वर्षांचा कालावधी मोजताना त्यांच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ मोजायचा नाही का? अथवा अध्यक्ष असलेल्या व्यक्तीस ही तरतूद लागू होणार की नाही? ङ्गपूर्ण वेळ संचालकफ ही संकल्पना व्यापारी बँकिंग क्षेत्रातील आहे. तेथे अध्यक्ष अथवा पूर्ण वेळ संचालक हे पगारी असतात. सबब व्यापारी बँकांसाठी करण्यात आलेली ही तरतूद नागरी सहकारी बँकांना लागू करताना त्यामध्ये सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीनुसार बदल करणे अपेक्षित होते. महाराष्ट्र सरकारने सन १९६९मध्ये राज्याच्या सहकार कायद्यात




सुधारणा करून कोणत्याही संचालकास सलग सहा वर्षांपेक्षा अधिक काळ अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष पदावर राहता येणार नाही, अशी तरतूद केली. सन १९८३मध्ये त्यात सुधारणा करून सहा वर्षांचा कालावधी १० वर्षांपर्यंत वाढविण्यात आला. परंतु ङ्गसलगफ या शब्दावर कायदेशीर कीस पाडत अनेक जण १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच पाच-सहा महिने अगोदर राजीनामा देऊन पुन्हा निवडून, पुन्हा पुढील १० वर्षांची पात्रता धारण करण्याची शक्यता होती. अथवा तशी उदाहरणे घडल्याने राज्य सरकारने १९८६मध्ये सहकार कायद्यात सुधारणा करीत ङ्गसलगफ शब्दाऐवजी ङ्गएकूणफ असा बदल केला. त्यामुळे तुकड्या-तुकड्यांचा कालावधी देखील मोजण्यात येऊ लागला. कायद्यातील पळवाट बंद झाल्याने अनेकांची निराशा झाली आणि सगळ्यांनी एकत्र येऊन २००७मध्ये सहकार कायद्यातून ही १० वर्षांची तरतूदच वगळली! केंद्र सरकारने संबंधित कायद्यात दुरुस्ती करताना महाराष्ट्र सरकारच्या सहकार खात्याचा अनुभव विचारात घेणे आवश्यक होते, असे गमतीने म्हणावेसे वाटते. कारण सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसाठी १९६९मध्ये दहा वर्षांच्या कार्यकाळाबाबत कलम ७३-अ मध्ये दुरुस्ती करताना सहकार खात्याने अनेक शक्यतांचा विचार करून, कायदा वाचताना कोठेही शंकेला वाव मिळणार नाही, याची खबरदारी घेतली होती. १) कलम ७३-अ नंतर खाली दिलेल्या खुलाशात १० वर्षांची मुदत मोजताना सदर कायदा अस्तित्वात येण्यापूर्वीचा कालावधी विचारात घ्यावयाचा नाही, असे स्पष्ट नमूद केले होते. २) कायद्यातील पळवाट शोधून सरकारच्या हेतूला हरताळ फासला जाऊ नये, म्हणून याच कलम ७३-अ च्या खाली खुलासा क्र.२ मध्ये असे नमूद केले होते की, १० वर्षांचा कालावधी संपण्यापूर्वी मागील १२ महिन्यांत पदाधिकाऱ्याने राजीनामा दिल्यास, त्याने १० वर्षांचा कालावधी पूर्ण केला, असे मानण्यात येईल. ३) याच कलमानंतर खुलाशामध्ये असेही स्पष्ट करण्यात आले होते, की अशा व्यक्तीस १० वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर, त्या समितीचा एक कालावधी (सध्या पाच वर्षे) संपेपर्यंत पुन्हा निवडणुकीस उभे राहता येणार नाही. म्हणजे पाच वर्षांच्या खंडानंतर ती व्यक्ती पुन्हा पुढील दहा वर्षांच्या कालावधीसाठी संचालक होऊ शकत होती. बँकिंग नियमन कायद्यामधील नवीन तरतुदींनुसार मात्र संबंधित व्यक्तीने संचालक म्हणून सलग १० वर्षांचा कालावधी एकदा जरी पूर्ण केला तरी त्यास त्या संस्थेवर आयुष्यभरात पुन्हा कधीही संचालक होता येणार नाही. बँकिंग नियमन कायद्यातील नवीन दुरुस्ती वाचताना, त्यामध्ये ङ्गसलग १० वर्षेफ हा उल्लेख केल्याने एक ऑगस्ट २०२५ नंतर होणाऱ्या निवडणुकींद्वारे प्रथम निवडून येणारे संचालक १० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच राजीनामा देतील व थोड्या कालावधीनंतर निवडणुकीद्वारे पुनश्च निवडून येतील व तहहयात संचालक राहू शकतील. परंतु संबंधित कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी, सलग दहा वर्षांचा कालावधी पूर्ण करणाऱ्या संचालकांना एक ऑगस्ट २०२५ नंतर नवीन तरतुदींनुसार त्या संस्थेचे कधीच पदाधिकारी होता येणार नाही. राज्यस्तरीय नागरी सहकारी संस्थांच्या निवडणुकांवर त्या त्या राज्यांत स्थापन झालेल्या निवडणूक प्राधिकरण ांचे नियंत्रण असते. या पार्श्वभूमीवर, रिझर्व्ह बँकेच्या कायद्यातील तरतुदींच्या आधारे स्वत:च्या कायद्यात बदल न करता, निवडणूक प्राधिकरण एखाद्या उमेदवारास अपात्र ठरविण्याचे धाडस करेल? कारण २०२१ नंतर झालेल्या निवडणुकांसाठी बँकिंग नियमन कायद्यात त्या वेळी आठ वर्षांची तरतूद असतानाही राज्य निवडणूक प्राधिकरणाने एकाही उमेदवारास अपात्र ठरविलेले नाही.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# १४ जणांनी 'घड्याळ' नाही लावलं, यादी पाहून अजित पवार नाराज, फडणवीसांकडे खंत व्यक्त..

**पुणे :** शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसमधील १४ माजी नगरसेवकांसह प्रमुख पदाधिकाऱ्यांना भारतीय जनता पक्षात प्रवेश देण्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नाराजी व्यक्त केल्याचे समजते. तर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातील माजी नगरसेवकांसह प्रमुख पदाधिकाऱ्यांचा शनिवारी भाजपप्रवेश होणार असून तसे 'निरोप' समाजमाध्यमांवरून देण्यास सुरुवात झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षातील धनकवडी येथील माजी नगरसेवक बाळा धनकवडे यांनी समाजमाध्यमांवरून भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले आहे. मुंबई येथील भाजप कार्यालयात त्यांचा पक्ष प्रवेश होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. माजी नगरसेवक धनवकडे यांनी आपण भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती 'महाराष्ट्र टाइम्स'ला दिली. धनकवडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षातील अन्य नेत्यांचाही पक्ष प्रवेश अपेक्षित असून त्यांची नावेही शुक्रवारी जाहीर होतील, अशी प्रतिक्रिया भाजपमधील उच्चपदस्थ नेत्याने व्यक्त केली.अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील खडकवासला, पर्वती, कोथरूड, वडगाव शेरी, हडपसर आणि शिवाजीनगर मतदारसंघातील काही माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांना भाजपमध्ये प्रवेश देण्याबाबत हालचाली सुरू आहेत. निवडून येण्याची खात्री वाटत असल्याने बहुतांश नेत्यांकडून भाजपमध्ये प्रवेश मिळवून उमेदवारी कशी मिळेल, यासाठी आटापिटा सुरू आहे. यामध्ये 'राष्ट्रवादी'तील आजी-माजी पदाधिकाऱ्यांचीही नावे चर्चेत आहेत.राष्ट्रवादी'तून भाजपमध्ये प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या १४ माजी नगरसेवकांची नावे अजित पवारांना सांगण्यात आली आहेत. या नेत्यांच्या सध्याच्या प्रचारातून पक्षाचे चिन्हच गायब झाल्याचे त्यांना दाखवून दिले आहे. या पार्श्वभूमीवर पवार यांनी थेट मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडेच या संभाव्य इनकमिंगबाबत नाराजी व्यक्त केल्याची 'राष्ट्रवादी'त चर्चा आहे. प्रवेशांवरून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला एक, तर 'राष्ट्रवादी'ला दुसरा न्याय, असाही प्रश्न 'राष्ट्रवादी'तील स्थानिक नेत्यांकडून उपस्थित करण्यात येत आहे.महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत गुरुवारी रात्री उशिरापर्यंत शहर भाजपच्या कोअर कमिटीची बैठक सुरू होती. यात कोणाचा पक्षप्रवेश करून घ्यायचा, अजित पवार यांच्या नाराजीबद्दल चर्चा अपेक्षित आहे. बैठकीत शिक्कामोर्तब झाल्यानंतर शनिवारी होणाऱ्या अन्य प्रवेशांचा मार्ग सुकर होईल.



उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ गुरुवारी तातडीने पुण्यात दाखल झाले असून, त्यांनी युतीच्या बैठकीस हजेरी लावली. कोअर कमिटीच्या बैठकीत संभाव्य प्रवेशांवर शिक्कामोर्तब होणार असून, शक्य असल्यास बैठकीतूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधण्यात येणार असल्याची प्रतिक्रिया उच्चपदस्थ सूत्रांनी दिली आहे.

## भाजपने बदलला 'कॅप्टन', नाशिकमध्ये बड्या नेत्याला धक्का

**नाशिक :** महापालिका निवडणुकांसाठी भाजपने मुलाखतीचा पहिला टप्पा पार करून रणसंग्रामची तयारी सुरू केली असतानाच, पक्षातील गटबाजी उफाळून आली आहे. महिनाभरापूर्वी नाशिक महापालिका निवडणूक प्रमुख पदावर नियुक्त केलेले आमदर राहुल ढिकले यांना हटवत, भाजपने आमदार देवयानी फरांदे यांना नाशिकचे कॅप्टन केले आहे. सेमिफायनलमध्ये भाजपने अचानक कॅप्टन बदलल्यामुळे राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे.नाशिक महापालिकेत भाजपने शंभर प्लसचा नारा दिला आहे. निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर भाजपने महापालिका ताब्यात ठेवण्यासाठी आपली सर्व ताकद पणाला लावली आहे. त्यासाठी नाशिकचे प्रभारी म्हणून संकटमोचक कुंभमेळामंत्री महाजन यांच्याकडे सोपवली. पाठोपाठ महापालिकेच्या निवडणूक प्रमुखपदी आमदार ढिकलेंची नियुक्ती केली होती.शहरातील फरांदे, सीमा हिरे या सीनिअर आमदारांना डावलून भाजपने ढिकलेंवर जबाबदारी



टाकली होती. त्यामुळे नाशिकच्या राजकारणात ढिकलेंचे महत्त्व वाढले होते. त्यानंतर भाजपने इच्छूक ९७० जणांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आटोपला आहे. आता अचानक कॅप्टन बदलून भाजपसह विरोधक बुचकळ्यात पडले आहेत.महापालिका निवडणुकांच्या तोंडावर एका उद्घाटन कार्यक्रमात आमदार ढिकले यांनी पक्षांतर्गत विरोधकांवर शरसंधान साधले होते. 'आजारी असतानाही माझ्या विरोधात ज्यांनी काम केले, माझी रॅली अडवली, त्यांना अस्मान दाखविल्याशिवाय राहणार नाही. ढाक लावून अस्मान नाही दाखवलं तर ढिकले नाही, असा इशारा पक्षांतर्गत विरोधकांना जाहीर व्यासपीठावरून दिला होता.

## माजी महापौर संजोग वाघेरे भाजपात जाणार

**चिंचवड :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला रामराम ठोकत पिंपरी-चिंचवडमधील माजी महापौर संजोग वाघेरे यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या दोन दिवसांत मुंबईत त्यांचा अधिकृत भाजप प्रवेश होणार असल्याची माहिती त्यांनी 'महाराष्ट्र टाइम्स ऑनलाईन'सोबत बोलताना दिली आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत संजोग वाघेरे यांनी शिवसेना (ठाकरे गट)कडून मावळ मतदारसंघात खासदार श्रीरंग बारणे यांना कडवे आव्हान दिले होते. मात्र या निवडणुकीत खासदार श्रीरंग बारणे विजयी झाले. संजोग वाघेरे यांनी शिवसेना ठाकरे गटाच्या पदाचा तसेच प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. भाजप प्रवेशाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. वाघेरे हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निकटवर्ती आणि समर्थक म्हणून ओळखले जातात. यापूर्वी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष पदही भूषवले होते.वाघेरे यांच्या पत्नी उषा संजोग वाघेरे या माजी स्थायी समिती अध्यक्षा राहिलेल्या आहेत.

## सिंगापूरच्या धर्तीवर बारामती स्मार्ट सिटी करण्याचे पवारांचे आश्वासन

**बारामती :** 'सन १९९१ पासून बारामतीकरांनी सातत्याने माझ्यावर विश्वास ठेवला. कधी सरकारमध्ये होतो, कधी नव्हतो. मात्र, बारामतीच्या विकासात कधी खंड पडू दिला नाही. सरकारमध्ये असो वा नसो, बारामतीसाठी काम करण्याची तळमळ कायम होती, आजही आहे. बारामतीत विकासासाठी निधी देताना दर्जेदार कामे करण्यावर भर आहे. हे बदल घडवण्याचे काम अजित पवारांशिवाय दुसरा कोणी करू शकत नाही, बारामतीचा सर्वांगीण विकास माझ्याशिवाय शक्य नाही,' असा ठाम विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला; तसेच पुढील पाच वर्षांची जबाबदारी माझ्यावर सोडा, असेही ते म्हणाले.बारामती नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित प्रचार सांगता सभेत अजित पवार बोलत होते. या वेळी नगराध्यक्षपदाचे उमेदवार सचिन सातव; तसेच नगरसेवक पदाचे उमेदवार, पदाधिकारी उपस्थित होते.



बारामती नगर परिषदेसाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. २१ रोजी निकाल असून, या ठिकाणी आठ जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या आहेत. ३३ जागांसाठी मतदान होणार आहे.अजित पवार म्हणाले, 'उद्या लोक विचार ऐकण्याच्या मनस्थितीत नसतील, म्हणून आजच सभा घेत आहे. मी शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचाराने चालणारा कार्यकर्ता आहे. जाती-धर्माच्या आधारे राजकारण करणे ही माझी संस्कृती नाही. बारामतीत कधीही जातीय वा धार्मिक तेढ निर्माण झाली नाही, आपल्या वडीलधाऱ्यांनी आपल्याला एकोप्याची शिकवण दिली आहे. हीच बारामतीची ताकद आहे. नगर परिषद निवडणुकीत आठ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. उर्वरित ३३ जागांसाठी माझ्या विचाराच्या उमेदवारांना मतदान करा.'बारामती शहरात विकासकामे करताना तुमची साथ गरजेची आहे.

## उरणमध्ये शिवसेनेत मोठा भूकंप, पदाधिकाऱ्यांचे सामूहिक राजीनामे

**रायगड :** रायगड जिल्ह्यातील राजकारणात मोठी उलथापालथ घडून आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षात तीव्र अंतर्गत असंतोष उफाळून आला आहे. पक्ष वाढीसाठी वर्षानुवर्षे मेहनत घेणाऱ्या निष्ठावान पदाधिकाऱ्यांना बाजूला सारून बाहेरून नियुक्त्या केल्या जात असल्याचा आरोप करत, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सामूहिक राजीनाम्यांचा पाऊस पाडला आहे. निवडणुकांच्या तोंडावरच झालेल्या या राजीनाम्यांमुळे रायगडचे राजकारण चांगलेच तापले आहे. या पदाधिकाऱ्यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्यावर मनमानी आणि एकतर्फी कारभार करण्याचा आरोप केला आहे.

उरण विधानसभा मतदारसंघात गेली अनेक वर्षे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता, आमदार थोरवे यांनी कर्जत येथून विनोद साबळे यांची उरण



विधानसभा मतदारसंघाच्या प्रभारी जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती केल्याने असंतोषाला तोंड फुटले. कोणतीही चर्चा न करता, स्थानिक पदाधिकाऱ्यांची बाजू न ऐकता ही नियुक्ती करण्यात आल्याचा आरोप शिवसैनिकांनी केला आहे. यामुळे पक्ष वाढवणारे बाजूला आणि बाहेरून आलेल्यांना संधी असा संतप्त सूर कार्यकर्त्यांतून उमटत आहे.याचबरोबर, आमदार थोरवे यांच्याकडून काही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना जाणीवपूर्वक त्रास दिला जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. शिवसेना वाढीसाठी झटणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यांनाच डावलले जात असल्याने पक्ष संघटन कमजोर होत असल्याची भावना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. या मनमानी कारभाराचा निषेध म्हणून उरण विधानसभा मतदारसंघातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपले सामूहिक राजीनामे शिवसेनेचे सचिव संजय मोरे यांच्याकडे सुपूर्द केले आहेत.या राजीनाम्यांमध्ये उरण तालुका प्रमुख दीपक ठाकूर आणि पनवेल तालुका प्रमुख रघुनाथ पाटील यांच्यासह अनेक जबाबदार पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. उरण आणि पनवेल तालुक्यातील दोन्ही प्रमुखांनी तातडीने पदत्याग केल्याने पक्षाला मोठा धक्का बसला आहे. आणखी अनेक पदाधिकारी लवकरच राजीनामे देणार असल्याची माहिती समोर येत आहे.विशेष म्हणजे, पक्षवाढीसाठी रात्रंदिवस मेहनत घेणारे उरण विधानसभा जिल्हाप्रमुख अतुल भगत यांना पदावरून बाजूला केल्याने शिवसैनिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. तळागाळात शिवसेनेचा विचार पोहोचवण्यासाठी झटणाऱ्या आणि कोणताही स्वार्थ न बाळगता काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर होत असलेला अन्याय या घटनेतून उघडपणे समोर आला आहे. निवडणुकीआधीच सुरू झालेली ही गळती एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये याचा मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पक्षाच्या निर्णय प्रक्रियेत स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता घेतले जाणारे निर्णय संघटनासाठी घातक ठरत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. रायगडमधील हा राजकीय उद्रेक पुढे कोणते वळण घेणार? याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मुलगी सुरक्षित राहील म्हणून बहिणीसोबत पाठवलं, पण..; अल्पवयीन बालिकेवर अत्याचार




**बीड :** बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातून एक अत्यंत संतापजनक आणि मन हेलावून टाकणारी घटना उघडकीस आली आहे. एका अल्पवयीन मुलीव अत्याचार करण्याची घटना घडली आहे. एका नराधमाने मुलीला एकटीत गाठून हे अमानवीय कृत्य केले आहे. आपली अल्पवयीन मुलगी मोठ्या बहिणीसोबत सुरक्षित राहील या विश्वासाने पाठवलेल्या १२ वर्षीय बालिकेवर एका नराधमाने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, यामुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे.या प्रकरणी केज तालुक्यातील युसूफ वडगाव पोलिस ठाण्यात पोक्सो कायद्यासह अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करत पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या आरोपीला अटक केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पीडित बालिकेचे कुटुंब अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत आहे. बालिकेचे वडील कर्नाटकात ऊसतोडणीसाठी गेले असून, आईची मानसिक स्थिती ठीक नसल्याने ती नातेवाइकांकडे राहत आहे. त्यामुळे इयत्ता सहावीमध्ये शिकणारी ही बालिका आपल्या ऊसतोड मजूर बहिणीसोबत केज तालुक्यात आली होती. बहिण आणि दाजी हे धारूर तालुक्यातील एका मुकादमाकडून उचल घेऊन केजमधील एका गावात ऊसतोडणीसाठी वास्तव्यास होते. सोमवारी रात्री सर्व मजूर शेतात ऊस ट्रॅक्टर भरण्यासाठी गेले असताना, याच संधीचा गैरफायदा घेत आरोपीने कृत्य केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

बालिका नैसर्गिक विधीसाठी जात असताना आरोपीने तिच्यावर अत्याचार केला. घटनेनंतर बालिकेने घडलेला प्रकार आपल्या बहिणीला सांगितला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ युसूफ वडगाव पोलिस ठाण्यात धाव घेण्यात आली आणि गुन्हा दाखल करण्यात आला.

दरम्यान, आरोपीला संशय येताच तो पसार होण्याच्या तयारीत होता. मात्र, युसूफ वडगाव पोलिसांनी तत्परता दाखवत आरोपीला कळंब बसस्थानकावरून ताब्यात घेऊन अटक केली आहे. आरोपीविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असून, पुढील तपास पोलीस करत आहेत. या घटनेमुळे केज तालुक्यासह परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## अल्पवयीन सालीवर वारंवार अत्याचार

**रायगड :** पेण तालुक्यातील वडखळ पोलीस ठाणे हद्दीत नातेसंबंधांचा गैरफायदा घेत अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची अत्यंत गंभीर घटना उघडकीस आली आहे. मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या एका गावात पीडित मुलीच्या बहिणीच्या पतीनेच तिच्यावर वेळोवेळी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवून तिला चार महिन्यांची गर्भवती केल्याचं निष्पन्न झालं आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १ ऑगस्ट २०२५ ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत आरोपी कपील राधेसिंह सोलंकी (वय २५) याने पीडित मुलगी ही अज्ञान व अल्पवयीन असल्याचं माहीत असतानाही तिचा गैरफायदा घेत वारंवार जबरदस्तीने तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. आरोपी हा पीडितेच्या बहिणीचा पती असल्याने घरातील विश्वासाचा फायदा घेत त्याने हे कृत्य केल्याचं तपासात समोर आलं आहे.या सातत्यपूर्ण लैंगिक अत्याचारामुळे पीडित मुलगी चार महिन्यांची गर्भवती राहिली. वैद्यकीय तपासणीदरम्यान गर्भधारणेची बाब उघडकीस आल्यानंतर संबंधितांनी पोलिसांशी संपर्क साधला. त्यानंतर पीडितेचा जबाब नोंदवून आवश्यक वैद्यकीय तपासणी व कागदपत्रे संकलित करण्यात आली. याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १८५/२०२५ नोंदवण्यात आला असून आरोपीविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कलमान्वये आरोपीस कठोर शिक्षा होण्याची तरतूद आहे.सध्या या गुन्ह्याचा अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक सांगळे करीत असून, आरोपीच्या अटकेसाठी प्रक्रिया सुरू आहे. तसेच, संबंधित साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात येत असून, वैद्यकीय व तांत्रिक पुरावे संकलित केले जात आहेत. पीडित मुलीला वैद्यकीय उपचारांसह मानसिक समुपदेशन देण्यासाठी बालकल्याण समिती व संबंधित यंत्रणांमार्फत आवश्यक ती मदत करण्यात येत आहे. या घटनेमुळे पेण तालुक्यात संतापाची लाट उसळली असून, अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. नात्यातील व्यक्तीकडूनच असा विश्वासघात होणे हे समाजासाठी गंभीर इशारा असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## आठवीच्या विद्यार्थिनीवर दोघांचा अत्याचार

**सांगली :** सांगली जिल्ह्यातील ईश्वरपूर येथे इयत्ता आठवीत शिकणाऱ्या शाळकरी मुलीवर दोघा जणांनी आळीपाळीने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ईश्वरपूर पोलिसांनी या प्रकरणी सराईत गुन्हेगार ऋतीक दिनकर महापुरे आणि आशिष जयवंत खाबे या दोघा जणांना बेड्या ठोकल्या आहेत. संतापजनक म्हणजे अत्याचारानंतर पीडितेचे कपडे घेऊन दोघांनी पळ काढल्याने तिला जवळपास एक किलोमीटर अंतरापर्यंत विवस्त्र चालत जावे लागले. दोघा नराधमांवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पीडित विद्यार्थिनी ही सांगली जिल्ह्यातील ईश्वरपूर येथील एका शाळेत इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेते. पीडिता आईसोबत ईश्वरपूर येथे वास्तव्यास आहे. मंगळवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास ऋतीक महापुरे याने पीडितेला फोन करून ईश्वरपूरमधील शिराळा नाक्यावर बोलावून घेतले. त्यानंतर ऋतीक आणि आशिष या दोघांनी तिला दुचाकीवरुन तुजारपूर फाट्यावरील एका ऊसाच्या शेतात नेले. त्या ठिकाणी दोघांनी तिच्यावर आळीपाळीने अत्याचार केल्याचा आरोप आहे.

## पत्नीचा मृत्यू, कपाळावर गोळीच्या खुणा, जवळच पिस्तुल..

**लखनौ :** एका महिलेची गोळ्या घालून हत्या करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशातील हापूर जिल्ह्यातील पिलखुवा पोलीस स्टेशन परिसरातील न्यू आर्यनगर परिसरात बुधवारी सकाळी या महिलेची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. मृत महिलेचे नाव २६ वर्षीय बबली असल्याची माहिती आहे. घटनेवेळी फक्त बबली आणि तिचा पती सचिन उपस्थित होते. मृतदेहाजवळ एक पिस्तूलही सापडले आहे, जे पोलिसांनी जप्त केले आहे.



पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला आहे आणि तो शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. घटनेची माहिती मिळताच, पिलखुवा पोलिसांनी घटनास्थळी येऊन प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणात अनेक लोकांना ताब्यात घेण्यात आले आहे आणि प्रथमदर्शनी महिलेची हत्या झाल्याचा संशय आहे.बबलीच्या कुटुंबाने तिच्या सासरच्या लोकांवर हत्येचा आरोप केला आहे. मृत महिलेची आई बर्फी आणि भाऊ सचिन यांनी सांगितले की, बुधवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास बबलीची हत्या करण्यात आली. त्यांनी सांगितले की, महिलेच्या कपाळावर गोळी लागल्याच्या खुणा आहेत. कुटुंबाचे म्हणणे आहे की, पतीच्या दारुच्या व्यसनावरुन त्यांचं पत्नी बबलीसोबत अनेकदा भांडण झालं.

मंगळवारी रात्री उशिरा त्यांच्यात वाद झाल्याची माहिती आहे.शेजाऱ्यांनीही बबली आणि तिच्या पतीमध्ये पूर्वी घरगुती वाद झाल्याचं सांगितलं. घटनेवेळी खोलीत फक्त बबली आणि तिचा पतीच होते, अशी माहिती आहे. पोलिसांनी संशयावरून तिचा पती सचिनला ताब्यात घेतले आहे. घराच्या छतावरून एक पिस्तूलही जप्त करण्यात आले आहे. हापूरचे एसपी कुंवर ज्ञानेंद्र सिंह यांनी सांगितले की, पिलखुवा कोतवाली परिसरात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शवविच्छेदन अहवाल आणि फॉरेन्सिक तपासणीच्या आधारे पुढील कारवाई केली जात आहे.

# ओव्हरटेक करताना दोन दुचाकींची समोरासमोर भीषण धडक, 'ती' एक चूक अनब आकाशचा जीव गेला, कोल्हापूर हळहळलं

**कोल्हापूर :** दुचाकी चालवताना हेल्मेट किती महत्त्वाचे असते हे अपघातानंतरच लक्षात येते. कितीतरी अपघातात हेल्मेट नसल्यामुळेच दुचाकी स्वाराचा जीव गेल्याच्या घटना घडल्या आहेत. कोल्हापुरात झालेल्या एका अपघाताच्या बाबतीतही अशीच घटना घडली आहे. दोन दुचाकींच्या समोरासमोर झालेल्या धडकेत दुचाकीस्वाराचे हेल्मेट नसणे एकाच्या जीवावर बेतले आहे.हातकणंगले–कुंभोज मार्गावरील नेज येथील लक्ष्मी मंदिराजवळील धोकादायक वळणावर हा अपघात झाला. बुधवारी दुपारी दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या या अपघातात आकाश अजित अबदाण (वय २१, रा. रुई, ता. हातकणंगले) या तरुणाचा मृत्यू झाला. तर अभिराज बबन काश्मिरे (वय १६), हर्षवर्धन जिनेंद्र काश्मिरे (वय १९, दोघे रा. रुई) आणि राहुल अशोक खोत (वय ३०, रा. हातकणंगले) हे तिघे गंभीर जखमी झाले आहेत.हा अपघात बुधवारी दुपारी सुमारास तीन वाजेच्या सुमारास घडला. आकाश, अभिराज आणि हर्षवर्धन हे तिघे बुलेट मोटारसायकल (चक ५१ ऋ ७२२७) वरून कुंभोजकडून हातकणंगलेकडे येत होते, तर राहुल खोत विनानंबर दुचाकीवरुन हातकणंगलेकडून कुंभोजच्या दिशेने जात होता. नेज गावाच्या हद्दीतील लक्ष्मी मंदिरासमोरील वळणावर उसाची ट्रॅक्टर ट्रॉली ओव्हरटेक करताना दोन्ही दुचाकींची समोरासमोर



जोरदार धडक झाली. धडकेचा आवाज इतका तीव्र होता की, परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून गेले.अपघातात आकाश अबदाण याला डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. रक्तस्राव मोठ्या प्रमाणात झाल्याने उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. त्याचे सहकारी अभिराज आणि हर्षवर्धन काश्मिरे तसेच दुसरा दुचाकीस्वार राहुल खोत या तिघांना गंभीर जखमा झाल्या. अपघातानंतर घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी तातडीने १०८ रुग्णवाहिकेला संपर्क साधला; मात्र ती वेळेत न आल्याने जवाहर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष बाबासाहेब चौगुले यांनी आपल्या चारचाकीतून जखमींना हातकणंगले ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. स्थानिक पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून अपघातग्रस्त वाहने ताब्यात घेतली आहेत. या अपघाताची नोंद हातकणंगले पोलिस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास पोलीस करत आहेत. दरम्यान धोकादायक वळण, वेग आणि हेल्मेटच्या अभावामुळे झालेल्या या अपघाताने पुन्हा एकदा रस्ते सुरक्षा नियमांचे पालन करण्याचे महत्व अधोरेखित केले आहे.

# पुण्यात ईशान किशनचा SMAT च्या फायनलमध्ये राडा, पहिल्यांदाच झारखंडने ट्रॉफीवर कोरलं नाव



**मुंबई :** सैयद मुश्ताक अली ट्रॉफी २०२५ च्या अंतिम सामन्यात झारखंडने हरियाणाचा ६९ धावांनी पराभव करत विजेतेपद पटकावले. ईशान किशनच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या झारखंडने प्रथम फलंदाजी करत २६२ धावांचा डोंगर उभारला, ज्यात ईशान किशनने १०१ आणि कुमार कुशाग्रने ८१ धावांची शतकी खेळी केली. प्रत्युत्तरात हरियाणाचा संघ १९३ धावांवर सर्वबाद झालापुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर झालेल्या या अंतिम सामन्यात झारखंडचा संघ सुरुवातीपासूनच वरचढ ठरला. ईशान किशनने ४९ चेंडूत १० षटकार आणि ६ चौकारांसह १०१ धावा केल्या. कुमार कुशाग्रने ३८ चेंडूत ५ षटकार आणि ८ चौकारांसह ८१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. अनुकूल रॉयने नाबाद ४० आणि रॉबिन मिंजने नाबाद ३१ धावा करून संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत पोहोचवले.हरियाणाचा संघ मात्र दबावाखाली दिसला. कर्णधार अंकित कुमार आणि आशीष सिवाच खाते न उघडताच बाद झाले. अर्श रंगा आणि यशवर्धन दलाल यांनी थोडा प्रतिकार केला, पण तेही १७ धावांवर बाद झाले. निशांत सिंधु आणि यशवर्धन दलाल यांच्या ६७ धावांच्या भागीदारीमुळे हरियाणाने १०० धावांचा टप्पा ओलांडला. मात्र, सिंधु बाद झाल्यानंतर संघाची पडझड झाली आणि १८.२ षटकांत १९३ धावांवर सर्वबाद झाले. झारखंडकडून सुशांत मिश्रा आणि बाल कृष्णा यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले, तर विकाश सिंह आणि अनुकूल रॉयने प्रत्येकी २ बळी घेतले.या विजयासह झारखंडने पहिल्यांदाच सैयद मुश्ताक अली ट्रॉफी जिंकण्याचा मान मिळवला. हरियाणाचा संघ सुरुवातीपासूनच लक्ष्याच्या दबावाखाली होता. कर्णधार अंकित कुमार, ज्याची या स्पर्धेत चांगली कामगिरी होती, तो पहिल्याच चेंडूवर बाद झाला. त्यानंतर आशीष सिवाचही लवकर बाद झाला. अर्श रंगा आणि यशवर्धन दलाल यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण तेही बाद झाले. पहिल्या ६ षटकांत हरियाणाने ५८ धावा केल्या होत्या, पण त्यांचे तीन महत्त्वाचे फलंदाज गमावले होते. निशांत सिंधु आणि यशवर्धन दलाल यांच्यातील भागीदारीमुळे धावसंख्या वाढली, पण संघाला विजय मिळवता आला नाही.

## ऑक्शनमध्ये ज्याला कोणीच नाही लावली बोली ; त्या खेळाडूने आता शतक ठोकल

**न्यूझीलंड :** आयपीएलचा मिनी लिलाव हा नुकताच पार पडला. या लिलावात अनेक खेळाडूंचे नशीब चमकले. काही खेळाडूंना कमबॅक करण्याची संधी ही मिळाली. पण आता चर्चा रंगतेय ती अनसॉल्ड खेळाडूंची. काही खेळाडूंना लिलावात बोली लागली नाही. खइङ ऑंलींळेप २०२६ ज्या खेळाडूला बोली लागली नाही त्या खेळाडूने आता शतकी खेळी खेळली.२०२६ च्या आयपीएल लिलावात जेव्हा ऊर्शोंप उेपुरू नाव घेण्यात आले तेव्हा न्यूझीलंडचा हा विश्वासार्ह फलंदाज काही फ्रँचायझींचे लक्ष वेधून घेईल अशी अपेक्षा होती. त्याने त्याची मूळ किंमत २ कोटी ठेवली होती. कोणत्याही संघाने त्याच्यासाठी बोली लावली नाही. लिलावात बोली न लागलेल्या न्यूझीलंडचा स्टार फलंदाज डेव्हॉन कॉनवेने क्रिकेट जगताचे लक्ष वेधून घेतले. त्याच्या खेळीची चर्चा आता सर्वत्र केली जात आहे.न्यूझीलंड आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तिसऱ्या कसोटी सामन्यात डेव्हॉन कॉनवेने शानदार फलंदाजी केली आणि पहिल्या डावात शतक ठोकले. १८ डिसेंबर रोजी खेळलेल्या या डावात संयम, तंत्र आणि आक्रमकतेचे परिपूर्ण मिश्रण दिसून आले. त्याने १४९ चेंडूत आपले शतक पूर्ण केले आणि १७ चौकार मारले. कॉनवेच्या खेळीमुळे तो बराच काळ क्रीजवर कसा राहू शकतो आणि संघासाठी कसा खेळू शकतो हे स्पष्टपणे दिसून येते.



डेव्हॉन कॉनवेचे हे त्याच्या कसोटी कारकिर्दीतील सहावे शतक आहे. यासह त्याने वेस्ट इंडिजविरुद्ध पहिले कसोटी शतक पूर्ण केले. डावखुरा फलंदाजने कठीण परिस्थितीत संघाला आघाडीवर ठेवले आणि आपला दर्जा सिद्ध केला. न्यूझीलंडसाठी त्याची खेळी महत्त्वाची मानली जाते. जरी आयपीएल ही पांढऱ्या चेंडूची स्पर्धा आहे आणि कॉनवेचे शतक रेड-बॉल क्रिकेटमध्ये आले असले तरी, या खेळीमुळे कॉनवेच्या फॉर्मबद्दल शंका नाही. कसोटी क्रिकेटमध्ये इतकी दमदार खेळी खेळल्याने खेळाडू आत्मविश्वासू आहे आणि तो कोणत्याही फॉरमॅटशी जुळवून घेऊ शकतो हे दिसून येते.

## गांगुलीने उत्तम साहावर दाखल केला अब्रूनुकसानीचा खटला

**कोलकाता :** येथील मेस्सीचा कार्यक्रम खरोखरच त्रासदायक ठरला. कोलकात्यातील चाहत्यांचा गोंधळाचा मुद्दा आता कुठे जरा शांत झाला होता तेवढ्यात आता माजी भारतीय कर्णधार सौरव गांगुलीने मोठं पाऊल उचललं. सौरव गांगुलीने कोलकात्याच्या अर्जे टिना फॅन क्लबचे अध्यक्ष उत्तम साहा यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई केली आणि अब्रुनुकसानीचा खटला दाखल केला आहे.

नुकतीच भारतात फुटबॉल सुपरस्टार लियोनेल मेस्सीच्या आगमनामुळे फुटबॉलचा क्रेज निर्माण झाला होता. विविध ठिकाणी मेस्सीच्या उपस्थितीचा चाहता वर्ग आनंद घेत होता, पण कोलकाता येथील इव्हेंट काही कारणांमुळे वादाचा कारण ठरला. कोलकात्यातील फॅन्सच्या गोंधळाच्या मुद्द्यावर चर्चा सुरु होतीच, आणि त्यातच भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार सौरव गांगुलीने अर्जेंटिनाच्या फॅन क्लबच्या अध्यक्ष उत्तम साहा यांच्याविरुद्ध अब्रूनुकसानीचा खटला दाखल केला आहे. या खटल्यात गांगुली यांनी साहा यांच्याकडून ५० कोटी रुपये



नुकसानभरपाई मागितली आहे.

गांगुलीने हा कठोर निर्णय साहा यांनी १३डिसेंबर रोजी लियोनेल मेस्सीच्या कोलकाता दौऱ्यादरम्यान झालेल्या गोंधळाशी संबंधित आरोप केल्यानंतर घेतला. साहा यांनी गांगुलीवर हा आरोप लावला होता की, गांगुलीचा इव्हेंटच्या व्यवस्थापनात काही तरी सहभाग होता, ज्यामुळे स्टेडियममध्ये गोंधळ झाला. या आरोपांना गांगुलीने 'खोटे, दुर्भावनायुक्त, अपमानजनक आणि मानहानीकारक' असे म्हटले आहे आणि याला त्यांच्या सार्वजनिक प्रतिमेला हानी पोहोचवण्यासाठी केलेले असंवेदनशील कृत्य मानले आहे.

# तिकिटाचे पैसे परत मिळणार की वाया गेले ?




**लखनौ :** भारतविरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात टी-२० मालिका सुरु आहे. या मालिकेतील चौथा टी-२० सामना काल लखनौमध्ये रंगणार होता पण सामना अचानक रद्द करावा लागला. खराब हवामानामुळे हा सामना रद्द करण्यात आला. लखनौ येथे खपवळर ी डींह अषीळलर ४ींह चरींलह धुक्यामुळे रद्द करण्यात आला. धुके इतके दाट होते की लखनौ येथील भारतरत्न श्री अटलबिहारी वाजपेयी एकाना स्टेडियमवर झालेल्या चौथ्या टी-२० सामन्यात एकही चेंडू खेळला गेला नाही, तर टॉसही होऊ शकला नाही. यामुळे तिकिट खरेदी करुन आलेले चाहते यावेळी निराश पाहायला मिळाले. आता या चाहत्यांना त्यांच्या तिकिटाचे पैसे परत मिळणार की नाही याबद्दल नियम काय आहे ते पाहा...बीसीसीआयचे दोन नियम आहेत. पहिला नियम सांगतो की जर एकही चेंडू न टाकता सामना रद्द केला गेला तर उर्वरित पैसे क्रिकेट चाहत्यांना परत केले जातील, तिकीट बुकिंग शुल्क वगळून. दुसऱ्या नियमात असे म्हटले आहे की जर सामना सुरू झाला आणि नंतर हवामानामुळे रद्द झाला तर तिकिटांचे पैसे परत केले जाणार नाहीत.तिकिटांच्या परतफेडीबाबत बीसीसीआयचे नियम जाणून घेतल्यानंतर, लखनौच्या चाहत्यांना निराश होण्याची गरज नाही.

सामना पाहू न शकल्याने ते निराश झाले असले तरी, त्यांचे पैसे सुरक्षित आहेत. ते वाया गेले नाही, कारण लखनौमधील टी-२० सामना एकही चेंडू न टाकता रद्द करण्यात आला. क्रिकेट चाहत्यांना त्यांचे तिकिटांचे पैसे कधी परत मिळतील याची माहिती राज्य क्रिकेट संघटना आणि अधिकृत तिकीट भागीदार लवकरच शेअर करतील.पहिल्या चार सामन्यांनंतर भारत दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-१ ने आघाडीवर आहे. कटकमध्ये खेळलेला पहिला टी-२० सामना भारताने जिंकला, तर मुल्लानपूरमध्ये खेळलेला दुसरा टी-२० सामना दक्षिण आफ्रिकेने जिंकला. धर्मशाळेत भारताने तिसरा टी-२० सामना जिंकला. चौथा टी-२० सामना रद्द झाल्यानंतर, मालिकेतील पाचवा आणि शेवटचा टी-२० सामना आता १९ डिसेंबर रोजी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर दोन्ही संघांमध्ये खेळला जाईल.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लग्नाच्या 10 दिवस आधी बदललं विवाहस्थळ, प्राजक्ता गायकवाडच्या लग्नात मोठा गोंधळ



**मुंबई :** मराठी मधील लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड ही नुकतीच विवाहबद्ध झाली. तिने इंडस्ट्री बाहेरील व्यक्ती शंभूराज खुटवड सोबत लग्न केले. यांचे लग्न हा गेले काही दिवस सोशल मीडियावरील चर्चेचा विषय होता. सोशल मीडियावर या लग्नाचे बरेच फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाले. त्यानंतर या दोघांनी एक मुलाखत दिली ज्यामध्ये त्यांनी लग्नाचे भन्नाट किस्से शेअर केले. प्राजक्ता गायकवाड आणि शंभूराज खुटवड यांचे लग्न पुण्यात पार पडले. त्यांच्या लग्नात बरीच वऱ्हाडी मंडळी आली होती. पण खरे तर या दोघांना पुण्यात लग्न करायचेच नव्हते. लोकमत फिल्मीला दिलेल्या मुलाखतीमध्ये प्राजक्ताने सांगितले की सुरुवातीला त्यांनी डेस्टिनेशन वेडिंग करण्याचे ठरवले होते. त्यासाठी त्यांनी महाबळेश्वर हे ठिकाण निवडलेले. लग्नाची संपूर्ण तयारी झालेली. डेस्टिनेशन वेडिंग असल्यामुळे मुहूर्त सकाळचा होता. त्यानुसार कपड्यांची खरेदी ही झालेली, पत्रिका वाटल्या होत्या. पण ऐनवेळी लग्नाच्या फक्त १० दिवस आधी मोठा गोंधळ झाला आणि त्यांना त्यांचे लोकेशन बदलावे लागले.याबाबत प्राजक्ताने सांगितले की आमचं लग्न आधी महाबळेश्वरला होणार होतं. या लग्नात आमची जवळची मंडळी उपस्थित राहणार होती. मला स्वतःला फार मोठं लग्न करायचं नव्हतं त्यामुळे आम्ही डेस्टिनेशन वेडिंग ठरवलेलं. पण नेमकं त्याच वेळी इलेक्शन आले. इलेक्शन मुळे बऱ्याच नातेवाईकांना आमच्या लग्नाला येणे शक्य नव्हतं म्हणून मग आम्ही आमच्या लग्नाचं लोकेशन बदललं.यावर प्राजक्ताचा नवरा म्हणाला की, लग्नाच्या आधी दहा दिवस लोकेशन चेंज झाल्यामुळे आम्हाला पुन्हा सगळं सुरुवातीपासून करावं लागलं. पुण्यात लग्न करायचा ठरल्यामुळे आम्हाला संध्याकाळचा मुहूर्त मिळाला. मग पुन्हा त्यानुसार कपडेही बदलले. प्राजक्ता म्हणाली की, या सर्वांमध्ये आमचे कुटुंबीय आणि माझ्या आईने खूप मदत केली.प्राजक्ता गायकवाडच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास तिने नांदा सौख्यभरे या मालिकेतून आपल्या करियरला सुरुवात केली. पण तिला खरी प्रसिद्ध झी मराठीवरील छत्रपती संभाजी महाराजांच्या मालिकेतील महाराणी येसूबाईच्या भूमिकेमुळे मिळाली.



# विनोद खन्ना यांच्यासोबतच्या इंटिमेट सीनवर माधुरी दीक्षितची प्रतिक्रिया

**मुंबई :** अभिनेत्री माधुरी दीक्षित बॉलिवूड सुपरस्टार अभिनेत्रींपैकी एक असून तिचा मोठा चाहतावर्ग आहे. माधुरीने आजवर अनेक गाजलेल्या सिनेमांमध्ये काम केलंय. पण, एका चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान माधुरी खूप अस्वस्थ झाली. १९८८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'दयावान' चित्रपटात माधुरीने विनोद खन्ना यांच्यासोबत काम केलेलं. या चित्रपटात माधुरी आणि विनोद खन्ना यांचा इंटिमेट सीन होता. अशातच आता माधुरीने नुकत्याच एका मुलाखतीमध्ये या सीनबद्दल भाष्य केलं आहे.

रेडिओ नशाला दिलेल्या मुलाखतीत माधुरीने विनोद खन्ना यांच्यासोबतच्या इंटिमेट सीनवर प्रतिक्रिया दिली. माधुरी म्हणाली, 'मला पूर्वी वाटायचं की, शिकण्याची प्रक्रिया आहे. तुम्ही प्रत्येक गोष्टीतून शिकता. मी त्यातून काहीतरी शिकले. पण या सीनमुळे मला खूप लाज वाटली. त्यानंतर, मी असे सीन न करण्याचं ठरवलं.' माधुरीने यापूर्वी सांगितलेलं की, जेव्हा तिने चित्रपट साइन केला तेव्हा तिला या सीनबद्दल कोणतीच कल्पना नव्हती. आजही जेव्हा ती मागे वळून पाहते तेव्हा तिला धक्का बसतो.रिपोर्टनुसार, चित्रपटातील माधुरी आणि विनोद यांच्यामध्ये खूपच बोल्ड इंटिमेट सीन्स होते. हे सीन शूट करताना विनोद यांनी मर्यादा ओलांडली. शूट करताना कट म्हटल्यानंतरही ते माधुरीला किस करत राहिले आणि तिचे ओठही चावले. यामुळे माधुरीला धक्का बसला आणि ती रडू लागली.माधुरीने तो सीन काढून टाकण्याची विनंतीही केली. पण, फिरोज खान यांनी तो सीन चित्रपटात ठेवण्याचा निर्णय घेतला. असंही म्हटलं जातं की, त्या सीनसाठी माधुरीला १ कोटी जास्त देण्यात आले होते. विनोद खन्ना यांनी नंतर माधुरीची माफी मागितली. पण, या घटनेचा माधुरीवर खोलवर परिणाम झाला आणि 'दयावान' नंतर तिने पुन्हा कधीही विनोद खन्ना यांच्यासोबत काम केलं नाहीदरम्यान, माधुरी दीक्षितच्या कामाबद्दल सांगायचं तर ती 'मिसेस देशपांडे' या वेब सीरिजमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ही वेब सीरिज १९ डिसेंबरला 'हॉटस्टार'वर प्रदर्शित होईल.



# एक किस ठरला ब्रेकअपचं कारण

**मुंबई :** कृतिका कामरा आणि करण कुंद्रा या दोघांनी २००९ मध्ये 'कितनी मोहब्बत है' या मालिकेद्वारे टीव्ही क्षेत्रात प्रवेश केला. या मालिकेने करण आणि कृतिका यांना घराघरात एक वेगळी ओळख दिली. प्रेक्षकांना त्यांची जोडी खूप आवडली. एकत्र काम करताना हे जोडपे एकमेकांच्या प्रेमात पडले होते.करण आणि कृतिका यांच्यात शोच्या सेटवर जवळीक वाढत चालली होती. आणि ते हळूहळू प्रेमात पडले. मात्र, त्यांचे नाते जास्त काळ टिकले नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार, राजीव खंडेलवाल हे त्यांच्या ब्रेकअपचे कारण असल्याचे म्हटले जाते. असे म्हटले जाते की शोच्या शूटिंगदरम्यान करणने कृतिकाला राजीवला किस करताना पाहिले होतेकरण हे सहन करू शकला नाही आणि दोघांमध्ये दुरावा वाढला. करणसोबत ब्रेकअप झाल्यानंतर कृतिकाचे नाव इव्हेंट मॅनेजर उदय सिंह गौरीशी जोडले गेले. त्यानंतर काही काळ अभिनेत्रीबाबत जॅकी भगनानीसोबत अफेअरच्या बातम्या येत होत्या. पण, यापैकी कोणतेही नाते यशस्वी झाले नाही.आता, अभिनेत्री क्रिकेट होस्ट गौरव कपूरला डेट करत असल्याचे समोर आले आहे.

# १७ व्या वर्षी पहिलं लग्न पण टिकला नाही संसार, ४० व्या वर्षी बिनलग्नाची झाली आई

**मुंबई :** अभिनेत्री माही गिलने तिच्या करिअरमध्ये अनेक उत्कृष्ट चित्रपटांमध्ये काम केलंय. 'देव. डी' या चित्रपटामुळे माहीला खरी ओळख मिळाली. या चित्रपटात काम केल्यानंतर तिनं कधीही मागे वळून पाहिलं नाही. चित्रपटांसोबतच अभिनेत्री तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत असते.माही गिलने वयाच्या १७ व्या वर्षी लग्न केलं. आता अभिनेत्रीचं दुसरं लग्न झालंय. तिला एक गोंडस मुलगी देखील आहे. माहीने एका मुलाखतीमध्ये तिच्या लग्नाबद्दल सांगितलेलं. २०१२ मध्ये द टाइम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत माहीने खुलासा केला की, जेव्हा गोष्टी व्यवस्थित नव्हत्या तेव्हा तिनं तिच्या पहिल्या पतीपासून वेगळं होण्याचा निर्णय घेतला.अभिनेत्रीचं खूप लहान वयात लग्न झालं आणि तिला याबद्दल काही कळत नव्हतं, म्हणून तिनं वेगळं होण्याचा निर्णय घेतल्याचं माहीनं सांगितलं. 'फॅमिली ऑफ ठाकूरगंज' या चित्रपटाच्या प्रमोशन दरम्यान, माहीने एका मुलाखतीत खुलासा केला की, ती तिच्या बॉयफ्रेंडसोबत राहते आणि त्यांना एक मुलगी आहे. माही म्हणाली, 'मला एका मुलीची आई असल्याचा खूप अभिमान आहे.'हो, मी अजून लग्न केलेलं नाही. जेव्हा मला लग्न करायचं असेल तेव्हा मी करेन. या वर्षी ऑगस्टमध्ये माझी मुलगी तीन वर्षांची होईल. तिचं नाव वेरोनिका आहे. ती माझ्यासोबत राहते. माझा एक बॉयफ्रेंड आहे. तो कॅथोलिक नाही. तो एक व्यावसायिक आहे.' असं माही म्हणालेली.२०१९ मध्ये, माही रवी केसरसोबत दिसली होती आणि ते दोघं डेट करत असल्याच्या चर्चा होत्या. काही वर्षांनी, २०२३ मध्ये, माही गिलने मुलाखतीत सांगितलं की, तिनं रवी केसरसोबत लग्न केलं आहे. आता अभिनेत्री तिच्या पती आणि मुलीसह गोव्यात राहते.दरम्यान, माही गिलच्या कामाबद्दल सांगायचं तर तिनं दबंग, दुर्गामती, गुलाल, दबंग २, नाम, अपहरण, साठी यांसारख्या सिनेमा आणि वेब सीरिजमध्ये काम केलं आहे.

# पारंपारीक चिकीत्सा पध्दतीला आधुनिकतेची जोड देऊन निरोगी आयुष्यासाठी संकल्प करुया- केंद्रिय आयुष मंत्री प्रतापराव जाधव ...!

**जनसंचलन/बुलढाणा**

पारंपारीक चिकीत्सा पध्दतीला आधुनिकतेची जोड देऊन निरोगी आयुष्याच्या संकल्पनेसाठी पारंपारीक औषधांचा उपयोग जगाच्या कल्याणासाठी करुया. असा दृढ संकल्प केंद्रिय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी औषध शिखर परिषदेत व्यक्त केला.

जागतीक आरोग्य संघटनेच्या वतीने दुसरी जागतीक पारंपारीक औषध शिखर परिषदेचे उदघाटन १७ डिसेंबर ला दिल्ली येथे झाले. या शिखर परिषदेत मार्गदर्शन करतांना आयुष मंत्री प्रतापराव जाधव बोलत होते. यावेळी व्यासपिठावर आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री जेपी नड्डा, दक्षीण आफ्रीकेचे आरोग्य मंत्री आरोन मोत्सो आलेदी, आयुष विभागाचे सचिव, वैद्य राजेश कोटेचा डब्ल्यु एच ओ, जि.टी.एम. सी. चे संचालक डॉ.श्यामा कुरुविल्ला, डी.जी. डब्ल्यु एच ओ चे वरीष्ठ सल्लागार डॉ.कथरीना बोहेम उपस्थित होते.

यावेळी बोलतांना केंद्रिय आयुष मंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की पारंपारीक औषध पध्दतीचा उपयोग हा आधुनिक विज्ञानाच्या सहाय्याने करुन भविष्याचा पाया रचण्याचे कामही औषध शिखर परिषद करणार आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय आयुर्वेदिक परंपरेला विकसीत करण्यासाठी २०१६ ला जागतीक आरोग्य संघटनेच्या मदतीने भारतात आयुष मंत्रालय सुरु केले. या मंत्रालयाच्या वतीने आयुर्वेद, सिध्दा, योगा आणि युनानी उपाचारात नाविण्यपुर्ण ग्लोबल ट्रेडिशनल मेडीसीन सेंटर तयार करण्यासाठी काम केल्या जात आहे.

भारतात दरवर्षी परदेशी विद्यार्थांना आयुर्वेद, योगा, युनानी आणि इतर प्रणालीचा अभ्यास करण्यासाठी १०४ प्रकारच्या शिष्यवृत्या देण्यात येतात. आतापर्यंत भारताने २६ देशांसोबत सामंजस्य करार केले आहे. जगातील ५० हुन अधिक संस्थेंसोबत सहयोग केला आहे. १५ विद्यापिठांमध्ये आयुष विभागाची स्थापना करण्यात आली आहे. ४३ देशांमध्ये आयुष माहिती केंद्र स्थापन करण्यात आले आहे. युके मध्ये अश्वगंधा चाचणी, जर्मनीमध्ये गुडूचा अभ्यास आणि लातविया मध्ये मधुमेह (डायबेटीज) आयुर्वेदीक अभ्यासाचा समावेश आहे. हा अभ्यास प्राचीन ज्ञान आणि आधुनिक विज्ञानाशी जोडला गेला आहे. जग हे कुटूंब आहे. या कुटूंबाच्या निरोगी आयुष्यासाठी भारत हा वचनबध्द आहे. सहयोगी देशांच्या सहकार्याने मतदीने आधुनिक विज्ञानाचा उपयोग करुन आयुष प्रणाली मजबुत करण्यासाठी काम करणार आहे. पारंपारीक औषधांचा उपयोग नागरीकांच्या निरोगी आरोग्य कल्याणासाठी करुया असा दृढ विश्वास आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी या शिखर परिषदेत मनोगत व्यक्त करतांना केला. भारत नेपाळ आयुर्वेद सामायीक वारसा हिमालयातील आयुर्वेदीक, औषधी वनस्पतीचा उपयोग आणि प्राचीन ज्ञानाच्या माध्यमातुन जागतीक स्तरावर नाविण्यपुर्ण औषध निर्मीतीचे कार्य केल्या जाणार आहे. भारतीय आयुर्वेद आणि नेपाळच्या आरोग्य सुविधेमध्ये पारंपारीक औषधांचे एकत्रीकरण तसेच १५० आयुष शिष्यवृत्ती हे भागीदारीचे प्रतिक असुन भारत नेपाळ संबधांमध्ये नवि उर्जा प्रस्थापीत करण्याचे काम करणार आहे. भारत आणि श्रीलंकेचे संबंध आयुर्वेद आणि सिध्दा सारख्या सामायीक वैद्यकिय प्रणालीमध्ये खोलवर रुजले आहे. १९६१ च्या आयुर्वेद कायदयाव्दारे श्रीलंकेने पारंपारीक ज्ञानाचे संस्थात्मीकरण केले आहे. हे संपुर्ण जगासाठी एक चांगले उदारण आहे. गेल्या काही वर्षात ७८ श्रीलंकेच्या विद्यार्थांना आयुष शिष्यवृत्तीव्दारे प्रशिक्षण मिळाले आहे. हे भविष्यातील संशोधन आणि परस्पर सहकार्यासाठी महत्वाचे आहे.



# शिर्ला धरण परिसरात बिबट्याचा वावर; नागरिकांमध्ये भीती!

## वन विभागाकडून सतर्क राहण्याचे आवाहन

**जनसंचलन/ खामगाव**

तालुक्यातील शिर्ला नेमाणे धरण परिसरात शुक्रवारी पहाटे बिबट्या आढळून आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. शिर्ला धरणातून खामगाव शहराला वाढीव योजनेंतर्गत पाणीपुरवठा नियमित पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे धरण परिसरात पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी, खासगी कंत्राटी कामगार तसेच स्थानिक नागरिकांची नेहमीच वर्दळ असते. अशा ठिकाणी बिबट्याचा वावर असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी पहाटे शिर्ला धरण परिसरात कामासाठी गेलेल्या एका खासगी कर्मचाऱ्याला बिबट्या दिसला. काही वेळ परिसरात फिरत असलेला बिबट्या पाहताच संबंधित कर्मचाऱ्याने तत्काळ इतर सहकाऱ्यांना माहिती दिली. त्यामुळे अनेकांनी त्या भागात जाणे टाळले आहे. शिर्ला धरणाच्या आजूबाजूला दाट झाडी, शेतजमीन आणि मोकळा परिसर असल्याने वन्य प्राण्यांचा अधूनमधून वावर होत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे; मात्र थेट बिबट्याचे दर्शन झाल्याने नागरिकांची चिंता वाढली आहे. सकाळी व सायंकाळी फिरायला जाणारे नागरिक, शेतकरी तसेच पाणीपुरवठा योजनेशी संबंधित कर्मचारी धास्तावले असून, पालकांनीही लहान मुलांना बाहेर पाठवू नये, अशी खबरदारी घेतली आहे.



१९ डिसेंबर रोजी पहाटे बिबट्या दिसून आला . गस्त घटनेची माहिती संबंधित विभाग व वन विभागाला देण्यात आली असून, परिसरात वाढवण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे, तसेच बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी पिंजरा लावणे, रात्रीच्या वेळी प्रकाशव्यवस्था वाढवणे आणि आवश्यक ती खबरदारी घेण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, वनविभागाकडून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले असून, धरण परिसरात किंवा शेतात जाणे टाळावे, रात्रीच्या वेळी बाहेर पडू नये तसेच बिबट्या दिसल्यास घाबरून न जाता प्रशासनाला कळवावे, असे सूचित केले आहे. बिबट्याचा वावर निश्चित होईपर्यंत खबरदारी घेण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.

# ऑटोरिक्षा-दुचाकीची धडक एक ठार

**जनसंचलन/मोताळा**

बुलढाणा मार्गावरील राजूर ७घाटात शुक्रवारी सायंकाळी वाजताच्या सुमारास ऑटोरिक्षा व दुचाकी यांच्यात धडक झाली. या अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार झाला असून, ऑटोरीक्षामधील पाच प्रवासी जखमी झाले आहेत. बुलढाण्याहून प्रवासी घेऊन ऑटोरीक्षा क्र. (एमएच २८ सी ११९२) मोताळ्याकडे येत असताना समोरून येणाऱ्या दुचाकी क्र. (एमएच २७ एजी ७१३१) राजूर घाटातील बालाजी मंदिराजवळ जोरदार धडक बसली. अपघातात दुचाकीस्वार वैभव सुरेश वाट (रा. बडनेरा, जि. अमरावती) याचा मृत्यू झाला



# आम्ही चार जण खांदा द्यायला आलोय भाजपवर गुलाबराव पाटलांची घणाघाती टीका...

वृत्तसंस्था/ सातारा

फलटण नगरपंचायत निवडणुकीच्या प्रचारात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते आणि राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी भाजपवर जोरदार टीका केली. मुख्यमंत्र्यांना प्रचारासाठी बोलवावं लागण्याची वाईट वेळ इथल्या नेत्यांवर आल्याचे ते म्हणाले. तसंच, माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकरांवर अप्रत्यक्षपणे टीका करत, आम्ही पुरुषांशी लढतो, बायकांच्या लफड्यात पडत नाही, असं वादग्रस्त विधान त्यांनी केलं आहे. साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनीही भाजपला इशारा देत, शिवसैनिकांची ताकद दाखवून देऊ, असा इशारा दिला आहे. फलटणमधील भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा झाली. मात्र, मुख्यमंत्र्यांनी भाषणात टीका करणे टाळले. याउलट, सायंकाळी झालेल्या शिवसेना उमेदवारांच्या प्रचार सभेत गुलाबराव पाटील यांनी भाजपवर बोचरी टीका केली. मुख्यमंत्री आले म्हणून आम्ही पण चारजण आलो. चारजण कशासाठी असतात? आम्ही खांदेकरी आहोत. राम बोलो भाई राम, बजा दिया काम, असं म्हणत त्यांनी भाजपवर हल्लाबोल केला. महिला डॉक्टर आत्महत्येच्या घटनेचा संदर्भ देत गुलाबराव पाटील म्हणाले की, कुठल्या मुलीने, सुनेने आत्महत्या केल्याच्या गुन्ह्यात माझं कधी नाव आलं नाही. फलटणमध्ये प्रचारासाठी मुख्यमंत्र्यांना बोलवावे लागणे ही भाजपची किती वाईट वेळ आहे, यावर त्यांनी भर दिला. मुख्यमंत्र्यांना नाईलाजाने यावे लागले. किती वाईट वेळ आहे. आय लव्ह यू माय मुख्यमंत्री, असे म्हणत त्यांनी विरोधकांवर खोचक टीका केली. दरम्यान, यावेळी शिवसेनेचे नेते आणि साताऱ्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनीही भाजपला इशारा दिला. ते म्हणाले, आम्ही शांत असलो तरी कुणी आरे केलं तर त्याच्या दहा पट आवाजात कारे करण्याची ताकद शिवसैनिकांमध्ये आहे. फलटणमध्ये काही झाले तर रामराजे यांनी फक्त हाक मारावी, संपूर्ण जिल्ह्यातील शिवसैनिक तिथे येतील, असं त्यांनी सांगितलं. शिवसेना कार्यकर्त्यांच्या केसालाही




धक्का लागला तर याद राखा, असा इशारा देत त्यांनी पुढे म्हटले की, पालकमंत्री दम देत नाही. मात्र, कुणी अंगावर आला तर पाठ दाखवून पळ काढणे, ही शिवसेनेची कार्यपद्धती नाही. दहा पावलं पुढे जाऊन चाल करण्याची ताकद शिवसैनिकांमध्ये आहे.

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे




ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली


मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# घरात घुसून महिलेसह तिच्या पतीला मारहाण, गुन्हा दाखल

जनसंचलन/ खामगाव

शहरातील सावजी ले-आउट परिसरात घरात घुसून एका महिलेसह तिच्या पतीला मारहाण केल्याची घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, मंगला रितेश वाडेकर (२९, रा. सावजी ले-आउट) या १६ डिसेंबर रोजी सायंकाळी सुमारे ७:१५ वाजता घरी एकट्याच असताना शुभम हरी इंगळे (२५, रा. सुटाळा, खामगाव) व एक अनोळखी व्यक्ती त्यांच्या घरी आले. तुझे पती कठे आहेत? अशी विचारणा केल्यानंतर पती घरी नसल्याचे समजताच दोघांनी महिलेला चापटा-बुक्क्या मारून शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. यानंतर काही वेळातच अर्जदाराचे पती घरी परतल्यानंतर त्यांनाही मारहाण करण्यात आली. यावेळी दोघा आरोपींनी पती-पत्नीला जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.




आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८